# 'संशोधन हा बौद्धिक मालमत्ता अधिकाराचा पाया'

पुणे, ता. ९ : 'पारंपरिक ज्ञान ही एक बौद्धिक मालमत्ता संस्कृती आहे, मात्र तरी देशात भौगोलिक संकेत बौद्धिक मालमत्ता हक्क नोंदणीचे प्रमाण खूप कमी आहे. संशोधन हा बौद्धिक मालमत्ता अधिकाराचा पाया आहे,' असे मत 'बौद्धिक संपदा अधिकार' या विषयावर आयोजित चर्चासत्रात तज्ज्ञ मंडळींनी व्यक्त केले.

'भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय' न्यू लॉ कॉलेजच्या 'बौद्धिक संपदा व सायबर कायदा' या केंद्राच्यावतीने प्राध्यापक विकास चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

बौद्धिक मालमत्ता कायदातज्ज्ञ ॲड. गणेश हिंगमिरे, पेटंट कायदा तज्ज्ञ ॲड तनू सिंग, ॲड. आनंद माहूरकर, सॉफ्टवेअर अभियंता व तंत्रज्ञान तज्ज्ञ ॲड. आशिष सोनावणे, बौद्धिक मालमत्ता सल्लागार ॲड. विद्याधर कुलकर्णी या चर्चासत्रात सहभागी झाले होते, तर न्यू लॉ कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. उज्ज्वला बेंडाळे आणि समन्वयक प्रा. डॉ. राजलक्ष्मी वाघ या वेळी उपस्थित होत्या.

ॲड. हिंगमिरे म्हणाले की, भौगोलिक संकेत बौद्धिक मालमत्ता हक्क कायदा दुर्लक्षित झाल्याची बाब चांगली नाही. बौद्धिक मालमत्ता हक्क जपणे महत्त्वाचे झाले आहे.

ॲड. सोनावणे म्हणाले की, पारंपारिक ज्ञान ही एक बौद्धिक मालमत्ता संस्कृती आहे. जी देशामध्ये रुजलेली आहे. ही संस्कृती टिकवणे आपल्या हातात आहे.

## सायबर सुरक्षेवर व्याख्यान

[illegible]

सकाळ

# सायबर गुन्हे, पुरावा आणि प्रशासन या विषयावर चर्चासत्र

पुणे, ता. २७ : कायदा क्षेत्रातील विविध आव्हानांवर मात करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या विधी कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी 'सायबर गुन्हे, पुरावा आणि प्रशासन' या विषयावर प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते.

सत्राचे उद्घाटन बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲंड गोवाचे अध्यक्ष ॲड. गजानन चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. न्यू लॉ कॉलेजच्या प्राचार्य डॉ. उज्वला बेंडाळे यांनी प्रस्ताविक करीत विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. पहिल्या दिवसाच्या सत्रात मुंबई महामार्गाचे पोलिस अधीक्षक संजय जाधव यांनी सायबर गुन्ह्यांचे प्रकार आणि खबरदारी याविषयी मार्गदर्शन केले. ॲड. आयुशी मिश्रा यांनी मध्यस्थीची भूमिका, सोशल नेटवर्किंग साइट्स, डेटा संरक्षण विधेयक आणि स्मार्ट क्राइम्स या विषयावर माहिती दिली. ॲड. वैभव साळुंखे यांनी न्यायिक अधिकारी आणि माहिती तंत्रज्ञान विभागासमोरच्या कार्यवाहीच्या संदर्भात व्यावहारिक पैलूंवर प्रकाश टाकला. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयातील सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक डॉ. संजय तुंगार, सायबर गुन्हे अन्वेषण तज्ज्ञ संदीप गडिया, ॲड. आशिष सोनवणे, ॲड. निशांत कातनेश्वरकर यांनी विविध विषयांवर माहिती दिली. प्रा. डॉ. राजलक्ष्मी वाघ यांनी बौद्धिक संपदा आणि सायबर कायद्याचे ज्ञान लोकांपर्यंत पोहोचवणे या सेलच्या उद्दिष्टांबद्दल माहिती दिली.

Pune, Pune-Today
28/11/2021 Page No. 102

# Training Session Lectures on "Cyber Crime Evidence and Governance"

Bharati Vidyapeeth Deemed to be University New Law College, Pune under the Advanced Exploration, Training of Intellectual Property and Cyber Law Cell (AETIP & CL) organised a training session for all the students of law on the 20th October 2021 on "Cyber Crime, Evidence and Governance".

The online session was recognised by the Bar Council of Maharashtra & Goa. It was inaugurated at the hands of Hon. Adv. Gajanan Babaji Chavan, chairman Bar Council of Maharashtra & Goa. Dr. Ujwala Bendale, Dean, Principal Incharge New Law College spoke on the importance of cyber laws. This event was organised by Dr. Rajlakshmi P Wagh, Assistant Professor, Incharge AETIP & CL Cell.

## Report on Two Day Workshop on "How to Write a Research Article"

BVDU New Law College, Advance Exploration, Training of Intellectual Property & Cyber Law Cell (AETIP & CL) in collaboration with Bar Council of Maharashtra & Goa organized a Two Day Workshop for the students of Law on "How to Write a Research Article". The workshop was inaugurated by Adv. GajananChavan, Chairman Bar Council of Maharashtra &Goa, Dr. UjwalaBendale Dean, Incharge Principal and Dr. Rajlakshmi P Wagh, Assistant Professor,In charge AETIP & CL Cell.The importance of research was emphasized and how it is an integral part of Law discipline.

Dr. Rajlakshmi Wagh discussed Research and its Methodologies and giving the students an insight into the various topics of research.

In the next session, Dr. Amit Kumar Jain spoke on the different parts of an Article and the Dos of effective writing.

## शोधनिबंध लिखाणाविषयी कार्यशाळा

**पुणे** : महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या सहकार्याने बिव्हीडीयू न्यू लॉ कॉलेजच्यावतीने शोधनिबंध लिखाणावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या बौद्धिक संपदा आणि सायबर विधी प्रशिक्षण विभागाच्यावतीने ही दोन दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन अध्यक्ष ॲड. गजानन चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अधिष्ठाता डॉ. उज्ज्वला बेंडाळे, डॉ. राजलक्ष्मी वाघ उपस्थित होते. कायद्यातील संशोधनाचे बारकावे आणि शोधपत्रिका लिहिण्यासंबंधी या वेळी मार्गदर्शन करण्यात आले.